सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

कार्यालय क्र. : ०२०–२५६९७३४१
०२०–२५६०११५३
फॅक्स क्र. : ०२०–२५६९७३४१
मोबाईल : ९८८१९०८०२०

संदर्भ : रासेयो/२०१९–२०/४४८ दि. २७/१२/२०१९

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
संबधित महाविद्यालये/विभाग/परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
फक्त पुणे शहर.

विषय– स्वच्छ सर्वेक्षण २०२० अंतर्गत प्लॅागेथॅानमध्ये एन. एन. एस. चे विद्यार्थी सहभागी करण्याबाबत

महोदय,

मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्या पत्रानुसार पुणे शहरामध्ये दोन किलोमीटर अंतराचा प्लॅागिंग ड्राईव्ह घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तरी या उपक्रमामध्ये नागरिक, लेखक, नाटककार, खेळाडू, तसेच महानगरपालिकेतील सर्व अधिकारी, कर्मचारी इत्यादी सहभागी होणार असून या माध्यमातून स्वच्छ सर्वेक्षण २०२० चा प्रसार मोठया प्रमाणावर करता येणार आहे.

सदर उपक्रम दि. २८ डिसेंबर २०१९ रोजी, सकाळी ०७.०० ते ०९.०० या वेळेत आपल्या महाविद्यालयातील रासेयो स्वंयसेवक प्लॅागेथॅान ड्राईव्हमध्ये सहभागी होण्यासाठी नदी पात्र याठिकाणी पाठवण्यात यावे. तसेच प्लॅागेथॅान ड्राईव्हनंतर भिडे पूल, डेक्कन जिमखाना, पुणे याठिकाणी सकाळी १०.०० वाजता स्वच्छतेची शपथ घेण्यात येणार आहे. तरी पुणे शहरातील सर्व रासेयो महाविद्यालयांनी स्वच्छ सर्वेक्षण २०२० अंतर्गत प्लॅागेथॅान या उपक्रमामध्ये सहभागी व्हावे. कळावे, ही विंनती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत– मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांचे पत्र.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे-७.
जावक/जावक क्र.: 822
दिनांक 26 DEC 2019
राष्ट्रीय सेवा योजना

पुणे Pune अद्वितीय & Unique

सह महापालिका आयुक्त यांचे
घनकचरा व्यवस्थापन कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र.:- मआ/घकव्यका/४३१५
दिनांक :- २४/१२/२०१९

मा. कुलगुरु कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक
दिनांक 24 DEC 2019
जावक क्रमांक सूची 8026
जावक दिनांक 26/12/19

प्रति,
**मा.कुलगुरू श्री.नितीन करमळकर,**
**सावित्रीबाइ फुले पुणे विद्यापीठ,**
**पुणे.**

**विषय :- स्वच्छ सर्वेक्षण २०२० अंतर्गत शनिवार दिनांक २८ डिसेंबर २०१९ रोजी प्लॉगेथॉनमध्ये NSS चे विद्यार्थी सहभागी करण्याबाबत.**

संदर्भ :- दिनांक १८/१२/२०१९ रोजी मा.महापौर यांनी दिलेले आदेश.

दिनांक १८/१२/२०१९ रोजी मा.महापौर यांनी बैठक घेऊन दिनांक २८ डिसेंबर २०१९ रोजी संपूर्ण शहरात प्लॉगेथॉन आयोजित करण्याचे आदेशित केले आहे. मा.पंतप्रधान महोदय यांनी याच प्रकारे चेन्नई येथे प्लॉगेथॉन ड्राईव्ह घेतल्याचे सांगून त्याच आधारे पुणे शहरातील सर्व प्रभागांत किमान २ किलोमीटर अंतराचा प्लॉगिंग ड्राईव्ह घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात मोठ्या प्रमाणावर नागरिक तसेच मा.सभासद, स्वयं सेवी संस्थांचे प्रतिनिधी, गणेश मंडळे, मोहल्ला कमिटी सदस्य, बचत गट, प्रतिष्ठीत व्यक्ती, लेखक, नाटककार, अभिनेते, अभिनेत्री, खेळाडू व मा.आमदार, मा.खासदार (आजी,माजी), तसेच महानगरपालिकेचे सर्व अधिकारी/कर्मचारी इ. एकत्र येऊन स्वच्छ सर्वेक्षण २०२० चा प्रचार/प्रसार देखील मोठ्या प्रमाणावर करता येणे शक्य होणार आहे.

यानुसार दिनांक २८ डिसेंबर २०१९ रोजी सकाळी ७.०० ते स.९.०० या नियोजित वेळेत प्लॉगेथॉन ड्राईव्ह घ्यावयाचा असून या प्लॉगेथॉन ड्राइव्हनंतर भिडे पूल, डेक्कन जिमखाना, पुणे या ठिकाणी सकाळी १०.०० स्वच्छतेची शपथ घेण्यात येणार आहे.

तरी या उपक्रमासाठी दिनांक २८ डिसेंबर २०१९ रोजी सदर वेळेत NSS चे सर्व विद्यार्थी नदीकिनारी सहभागी होण्याबाबत आपणाकडून सर्व कॉलेजेसना परिपत्रक काढून तशा सूचना देण्यात याव्यात, अशी विनंती आहे.

मा.स.कळावे.

आदरपूर्वक,

(सौरभ रांव)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

Dir. (NSS)